महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

मासं/रवका/न.क्र.५
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmhrmsedcl@gmail.com
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. ०२२ - ६९४२५१४१

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ७०३ दिनांक ०१ / ०१ / २०२६

**विषय:** सन २०२६ मध्ये राष्ट्र पुरुष/थोर व्यक्ती यांची जयंती व राष्ट्रीय दिन साजरे करण्याबाबत.

**संदर्भ:** १) शासन परिपत्रक क्र. जपुती-२०२५/प्र.क्र.१९५/कार्या-जपुक दि.२९.१२.२०२५.
२) शासन परिपत्रक क्र. जपुती-२०२५/प्र.क्र.१९५/कार्या-जपुक दि.३१.१२.२०२५.

*****

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, यांचे शासन परिपत्रक क्र. जपुती-२०२५/प्र.क्र.१९५/कार्या-जपुक दि.२९.१२.२०२५ अन्वये सन-२०२६ मध्ये राष्ट्रीय पुरुष/थोर व्यक्ती यांची जयंती व राष्ट्रीय दिनांचे कार्यक्रम साजरे करण्याबाबतच्या सूचना पारित करण्यात आलेल्या आहेत. तसेच समक्रमांकाचे शासन परिपत्रक दि.३१.१२.२०२५ अन्वये श्री संत गुलाबराव महाराज यांची जयंती दि.०६.०७.२०२६ रोजी साजरी करण्याबाबतच्या सूधारीत सूचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत. दि.२९.१२.२०२५ व दि.३१.१२.२०२५ रोजीचे शासन परिपत्रक माहितीस्तव सोबत जोडण्यात आले आहे.

२. सर्व संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांना विनंती करण्यात येते की, शासन परिपत्रक दि.२९.१२.२०२५ सोबतचे परिशिष्ट तसेच शासन परिपत्रक दि.३१.१२.२०२५ मधील सूचनांचे अवलोकन करुन राष्ट्रीय पुरुष/थोर व्यक्ती यांची जयंती व राष्ट्रीय दिन साजरे करण्याकरिता विहीत करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार योग्य ती कार्यवाही करावी.

३. तसेच, दिनांक २६ नोव्हेंबर रोजी येणारा संविधान दिवस दरवर्षी साजरा करण्याबाबत प्रशासकीय परिपत्रक क्र.२८७ दि.१७.०३.२०१० अन्वये सूचना पारीत करण्यात आल्या असून त्यानुसार कंपनीच्या सांघिक व क्षेत्रिय कार्यालयांमध्ये संविधान दिवस साजरा करण्यात यावा. शासन परिपत्रकान्वये भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी अवतारदिन कार्यक्रमाच्या स्वरूपासंदर्भात स्वतंत्ररित्या आदेश निर्गमित करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत. याबाबत शासनाने भविष्यात आदेश पारीत केल्यानंतर त्या अनुषंगाने सुधारीत सूचना निर्गमित करण्यात येतील.

४. शासन परिपत्रक क्र.GAD-49022/50/2024-GAD(DESK-29) दि.१०.०१.२०२५ अन्वये राष्ट्रपुरूष/थोर व्यक्ती यांची जयंती साजरी करताना संबंधित राष्ट्रपुरूष/थोर व्यक्ती यांचा माहिती फ़लक (अल्प परिचय) प्रदर्शित करण्याबाबतच्या सूचना पारित करण्यात आलेल्या आहेत. सदरच्या सूचना परिपत्रक क्र.मासं/रवका/न.क्र.३४८/०३०९७ दि.३०.०१.२०२५ अन्वये कंपनी अंतर्गत निर्गमित करण्यात आलेल्या आहेत, त्या अनुषंगाने राष्ट्रीय पुरुष/थोर व्यक्ती यांची जयंती व राष्ट्रीय दिन साजरे करत असतांना सदर सूचनांची अंमलबजावणी करण्यात यावी.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**सोबत:** शासन परिपत्रक दि.२९.१२.२०२५ व दि.३१.१२.२०२५.

(भूषण कुलकर्णी)
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (वित्त)/(संचलन)/(मासं)/(प्रकल्प)/(वाणिज्य) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (वित्त व लेखा)/(वितरण)/(पायाभूत आराखडा)/(विशेष प्रकल्प)/(मासं)/(सुवअं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी सल्लागार/मुख्य तपास अधिकारी/ कंपनी सचिव, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई. (सांघिक कार्यालय/क्षेत्रीय कार्यालय)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

सन २०२६ मध्ये राष्ट्र पुरुष / थोर व्यक्ती यांची
जयंती व राष्ट्रीय दिन साजरे करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक : जपुती-२०२५/प्र.क्र.१९५/कार्या-जपुक (२९)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २९ डिसेंबर,२०२५.

**संदर्भ:-** सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.GAD-49022/50/2024-GAD(DESK-29), दिनांक १०.०१.२०२५.

**प रि प त्र क :-**

सन २०२६ मध्ये राष्ट्र पुरुष / थोर व्यक्ती यांची जयंती व राष्ट्रीय दिनांचे कार्यक्रम सोबत जोडलेल्या परिशिष्टानुसार मंत्रालयात व सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालयात साजरे करण्यात यावेत.

२. परिशिष्टात दर्शविलेले कार्यक्रम सार्वजनिक सुट्टी, साप्ताहिक सुट्टी (शनिवार व रविवार) आणि स्थानिक सुट्टीच्या दिवशी येत असतील आणि या संदर्भात केंद्र शासनाने कार्यक्रमात बदल सुचविल्यास त्याप्रमाणे साजरे करण्यात यावेत, अन्यथा ते कार्यक्रम त्याच दिवशी साजरे करण्यात यावेत.

३. विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या विभागातील / जिल्हयातील सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालयात सदर कार्यक्रम आयोजित करण्याबाबत आवश्यक त्या सूचना निर्गमित करुन त्यांच्या अंमलबजावणीबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

तसेच सदर शासन परिपत्रक सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालयाबरोबरच राज्यातील सर्व महाविद्यालये व सर्व शाळा यांनाही लागू राहील.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२५१२२९१६०४५८९१०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by HEMANT ANANT MAHAJAN
Date: 2025.12.29 16:06:44 +05'30'

**( हेमंत महाजन )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री ( नगरविकास व गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
७. प्रधान सचिव (प्र.ना.उ.सु.), सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई.
८. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व मंत्रालयीन विभाग.
१०. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने
११. सह सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग (प्रशा-४), यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरीता.
१२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई ( प्रसिध्दी देण्यासाठी )
१३. सर्व विभागीय आयुक्त.
१४. सर्व जिल्हाधिकारी.
१५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१६. आयुक्त, सर्व महानगरपालिका
१७. निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली
१८. निवड नस्ती ( कार्यासन-२९).

**शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.जपुती-२०२५/प्र.क्र.१९५/ कार्या-जपुक (२९),दि.२९.१२.२०२५ चे परिशिष्ट**
**सन २०२६ मध्ये मंत्रालय,शासकीय / निमशासकीय कार्यालयात साजरे करावयाच्या जयंती /राष्ट्रीय दिन कार्यक्रमांची यादी**

| अ.क्र. | जयंती/राष्ट्रीय दिन | इंग्रजी महिना व दिवस | वार | भारतीय महिना व दिवस | कार्यक्रमाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | सावित्रीबाई फुले जयंती | ३ जानेवारी, २०२६ | शनिवार | १३ पौष, शके १९४७ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| २ | जिजाऊ माँ साहेब जयंती | १२ जानेवारी,२०२६ | सोमवार | २२ पौष, शके १९४७ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ३ | स्वामी विवेकानंद जयंती | १२ जानेवारी,२०२६ | सोमवार | २२ पौष, शके १९४७ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ४ | नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती | २३ जानेवारी,२०२६ | शुक्रवार | ०३ माघ, शके १९४७ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ५ | बाळासाहेब ठाकरे जयंती | २३ जानेवारी,२०२६ | शुक्रवार | ०३ माघ, शके १९४७ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ६ | संत रविदास महाराज जयंती **(माघ पौर्णिमा या तिथीनुसार)** | ०१ फेब्रुवारी,२०२६ | रविवार | १२ माघ, शके १९४७ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ७ | संत सेवालाल महाराज जयंती | १५ फेब्रुवारी, २०२६ | रविवार | २६ माघ, शके १९४७ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ८ | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | १९ फेब्रुवारी, २०२६ | गुरुवार | ३० माघ, शके १९४७ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ९ | बाळशास्त्री जांभेकर जयंती | २० फेब्रुवारी, २०२६ | शुक्रवार | ०१ फाल्गुन,शके १९४७ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| १० | संत गाडगे बाबा जयंती | २३ फेब्रुवारी, २०२६ | सोमवार | ४ फाल्गुन, शके १९४७ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ११ | यशवंतराव चव्हाण जयंती | १२ मार्च, २०२६ | गुरुवार | २१ फाल्गुन, शके१९४७ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| १२ | शहीद दिन | २३ मार्च, २०२६ | सोमवार | ०२ चैत्र, शके १९४८ | शहीद भगतसिंग,राजगुरु व सुखदेव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे |
| १३ | महात्मा ज्योतिबा फुले जयंती | ११ एप्रिल, २०२६ | शनिवार | २१ चैत्र, शके १९४८ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| १४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती | १४ एप्रिल, २०२६ | मंगळवार | २४ चैत्र, शके १९४८ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| १५ | महात्मा बसवेश्वर जयंती **(वैशाख शुद्ध तृतीया (अक्षय तृतीया ) तिथीनुसार)** | १९ एप्रिल, २०२६ | रविवार | २९ चैत्र, शके १९४८ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| १६ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती | ३० एप्रिल, २०२६ | गुरुवार | १० वैशाख, शके १९४८ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| १७ | छत्रपती संभाजी महाराज जयंती | १४ मे, २०२६ | गुरुवार | २४ वैशाख, शके १९४८ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| १८ | दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस | २१ मे, २०२६ | गुरुवार | ३१ वैशाख, शके १९४८ | दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवसाची शपथ घेणे |
| १९ | स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती | २८ मे, २०२६ | गुरुवार | ७ ज्येष्ठ, शके १९४८ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| २० | अहिल्यादेवी होळकर जयंती | ३१ मे, २०२६ | शनिवार | १० ज्येष्ठ, शके १९४८ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| २१ | महाराणा प्रतापसिंह जयंती **(ज्येष्ठ शुक्ल तृतीया या तिथीनुसार)** | १७ जून, २०२६ | बुधवार | २७ ज्येष्ठ, शके १९४८ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| २२ | राजर्षि शाहू महाराज जयंती | २६ जून, २०२६ | शुक्रवार | ०५ आषाढ, शके १९४८ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| २३ | वसंतराव नाईक जयंती | १ जुलै, २०२६ | बुधवार | १० आषाढ, शके १९४८ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| २४ | लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती | २३ जुलै, २०२६ | गुरुवार | ०१ श्रावण , शके १९४८ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| २५ | साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती | १ ऑगस्ट, २०२६ | शनिवार | १० श्रावण, शके १९४८ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| २६ | क्रातिसिंह नाना पाटील जयंती | ३ ऑगस्ट, २०२६ | सोमवार | १२ श्रावण, शके १९४८ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| २७ | सद्भावना दिवस | २० ऑगस्ट, २०२६ | गुरुवार | २९ श्रावण, शके १९४८ | **सद्भावना दिवसाची शपथ घेणे** |
| २८ | राजे उमाजी नाईक जयंती | ७ सप्टेंबर, २०२६ | सोमवार | १६ भाद्रपद, शके १९४८ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| २९ | भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी अवतारदिन **(भाद्रपद शुक्ल द्वितीया या तिथीनुसार)** | १३ सप्टेंबर, २०२६ | रविवार | २२ भाद्रपद, शके १९४८ | **याबाबतचे आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील.** |
| ३० | केशव सीताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे जयंती | १७ सप्टेंबर, २०२६ | गुरुवार | २६ भाद्रपद,शके १९४८ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ३१ | पंडीत दीनदयाळ उपाध्याय जयंती-अंत्योदय दिवस | २५ सप्टेंबर, २०२६ | शुक्रवार | ०३ आश्विन, शके १९४८ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |

| अ.क्र. | जयंती/राष्ट्रीय दिन | इंग्रजी महिना व दिवस | वार | भारतीय महिना व दिवस | कार्यक्रमाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| ३२ | महात्मा गांधी जयंती | २ ऑक्टोबर, २०२६ | शुक्रवार | १० आश्विन, शके १९४८ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ३३ | लाल बहादूर शास्त्री जयंती | २ ऑक्टोबर, २०२६ | शुक्रवार | १० आश्विन, शके १९४८ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ३४ | डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम जयंती | १५ ऑक्टोबर, २०२६ | गुरुवार | २३ आश्विन, शके १९४८ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ३५ | महर्षि वाल्मिकी जयंती **(अश्विन पौर्णिमा या तिथीनुसार )** | २६ ऑक्टोबर, २०२६ | सोमवार | ०४ कार्तिक, शके १९४८ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ३६ | इंदिरा गांधी पुण्यतिथी व राष्ट्रीय संकल्प दिवस | ३१ ऑक्टोबर, २०२६ | शनिवार | ९ कार्तिक, शके १९४८ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ३७ | वल्लभभाई पटेल जयंती व राष्ट्रीय एकता दिवस | ३१ ऑक्टोबर,२०२६ | शनिवार | ९ कार्तिक, शके १९४८ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे व राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ घेणे. |
| ३८ | पंडीत नेहरु जयंती | १४ नोव्हेंबर, २०२६ | शनिवार | २३ कार्तिक, शके १९४८ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ३९ | बिरसा मुंडा जयंती | १५ नोव्हेंबर, २०२६ | रविवार | २४ कार्तिक, शके १९४८ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ४० | इंदिरा गांधी जयंती व राष्ट्रीय एकात्मता दिन | १९ नोव्हेंबर, २०२६ | गुरुवार | २८कार्तिक, शके १९४८ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे व राष्ट्रीय एकात्मता दिवसाची शपथ घेणे. |
| ४१ | * संविधान दिवस | २६ नोव्हेंबर, २०२६ | गुरुवार | ०५ मार्गशिर्ष, शके,१९४८ | भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन करणे |
| ४२ | संत संताजी जगनाडे महाराज जयंती | ८ डिसेंबर,२०२६ | मंगळवार | १७ मार्गशिर्ष, शके १९४८ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ४३ | अटल बिहारी वाजपेयी जयंती | २५ डिसेंबर,२०२६ | शुक्रवार | ०४ पौष, शके १९४८ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ४४ | वीर बाल दिवस | २६ डिसेंबर,२०२६ | शनिवार | ०५ पौष, शके १९४८ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ४५ | डॉ.भाऊसाहेब उर्फ पंजाबराव देशमुख जयंती | २७ डिसेंबर,२०२६ | रविवार | ०६ पौष, शके १९४८ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |

* शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.जपुती-२२०८/१३३८/प्र.क.१०९/०८/२९, दि.२४.११.२००८ मधील सूचनांनुसार विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुखांनी कार्यवाही करावी. शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र. GAD-49022/50/2024-GAD(DESK-29), दिनांक १०.०१.२०२५ मधील सूचनांनुसार विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुखांनी कार्यवाही करावी.

************

सन २०२६ मध्ये राष्ट्र पुरुष / थोर व्यक्ती यांची
जयंती  व राष्ट्रीय दिन साजरे करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक : क्र.जपुती-२०२५/प्र.क्र.१९५/ कार्या-जपुक**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: ३१ डिसेंबर, २०२५.

पहा:- शासन परिपत्रक क्रमांक : क्र.जपुती-२०२५/प्र.क्र.१९५/ कार्या-जपुक,दि.२९.१२.२०२५

## परिपत्रक :-

मंत्रालयात व सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालयात राष्ट्र पुरुष / थोर व्यक्ती यांची जयंती व राष्ट्रीय दिनांचे कार्यक्रम सन २०२६ मध्ये आयोजित करण्याबाबत शासन परिपत्रक दिनांक २९.१२.२०२५ च्या परिशिष्टानुसार कळविण्यात आले आहे.

२. श्री संत गुलाबराव महाराज यांचा सन २०२६ मध्ये आयोजित करावयाच्या जयंती कार्यक्रमामध्ये नव्याने समावेश करण्यात आला आहे. तो खालीलप्रमाणे आयोजित करण्यात यावा.:-

| अ. क्र. | जयंती/राष्ट्रीय दिन | इंग्रजी महिना व दिवस | वार | भारतीय महिना व दिवस | कार्यक्रमाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री संत गुलाबराव महाराज जयंती | ०६ जुलै, २०२६ | सोमवार | ०६ भाद्रपद शके, १९४८ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |

३. विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या विभागातील / जिल्हयातील सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालयात सदर कार्यक्रम आयोजित करण्याबाबत आवश्यक त्या सूचना निर्गमित करुन त्यांच्या अंमलबजावणीबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

तसेच सदर शासन परिपत्रक सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालयाबरोबरच राज्यातील सर्व महाविद्यालये व सर्व शाळा यांनाही लागू राहील.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२५१२३११७२३१४४४०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by HEMANT ANANT MAHAJAN
Date: 2025.12.31 17:28:52 +05'30'

**( हेमंत महाजन )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री ( नगरविकास व गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

५. सर्व मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
७. प्रधान सचिव (प्र.ना.उ.सु.), सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई.
८. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व मंत्रालयीन विभाग.
१०.सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने
११.सह सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग (प्रशा-४), यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरीता.
१२.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई ( प्रसिध्दी देण्यासाठी )
१३.सर्व विभागीय आयुक्त.
१४.सर्व जिल्हाधिकारी.
१५.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१६.आयुक्त, सर्व महानगरपालिका
१७.निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली
१८.निवड नस्ती ( कार्यासन-२९).

क्र.साप्रवि/रवका/न.क्र.३४८/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
**मुंबई - ४०० ०१९.**

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. २८७ दिनांक १७ / ०३ / २०१०

विषय : २६ नोव्हेंबर हा दिवस 'संविधान दिवस' म्हणून साजरा करण्याबाबत.

संदर्भ : शासन परिपत्रक क्र.जपुती-२२०८/१३३८/प्र.क्र.१०९/०८/२९ दि.२४.११.२००८.

......

भारतीय संविधानाबाबत जनजागृती आणि सर्व नागरिकांना संविधानाची ओळख व्हावी याकरिता उपरोक्त संदर्भिय शासन परिपत्रकान्वये दरवर्षी २६ नोव्हेंबर हा दिवस 'संविधान दिवस' म्हणून साजरा करण्याबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर परिपत्रकाची प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

२. या अनुषंगाने सर्व संबंधितांना विनंती करण्यात येते की, दि.२४.११.२००८ च्या सोबत जोडलेल्या शासन परिपत्रकाचे अवलोकन करून दरवर्षी २६ नोव्हेंबर हा दिवस 'संविधान दिवस' म्हणून साजरा करण्यात यावा. तसेच या दिवशी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन करुन राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेण्यात यावी.

३. सदर प्रशासकीय परिपत्रक www.mahadiscom.in या कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

सहपत्र : वरीलप्रमाणे.

*( सु. य. पाटील )*
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रत :

विभागीय व त्यावरील सर्व कार्यालयांना महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.

D:\O&M\Adm Cir.F.N.348.doc

**भारतीय संविधानाबाबत जनजागृती आणि सर्व नागरिकांना संविधानाची ओळख व्हावी या करीता राज्यात दरवर्षी दिनांक २६ नोव्हेंबर हा दिवस "संविधान दिवस" म्हणुन साजरा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक, जपुती २२०८/१३३८/प्र.क्र.१०९/०८/२९
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :२४ नोव्हेंबर, २००८

**प्रस्तावना :-**

भारताचे एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा व सर्व नागरिकांस सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा व उपासना यांचे स्वातंत्र्य व समानता प्राप्त करुन देण्याच्या अनुषंगाने दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी भारताची स्वतंत्र राज्य घटना अंगिकृत आणि अधिनियमित करुन स्वतःप्रत अर्पण केलेली आहे. सदर राज्य घटना ही दिनांक २६ जानेवारी, १९५० पासून अंमलात आली तरी भारतीय संविधानाची माहिती अजूनही देशाच्या बहुतेक नागरिकांना तसेच संविधानानुसार काम करणाऱ्या सर्व यंत्रणेतील अधिकारी/कर्मचारी यांनाही नाही. त्यामुळे या संविधानाने शासकिय, न्यायीक इत्यादी सारख्या यंत्रणा निर्माण झाल्या त्या संविधानाची ओळख सर्वांना करुन देण्याच्या अनुषंगाने राज्यात दरवर्षी दिनांक २६ नोव्हेंबर हा दिवस **"संविधान दिवस"** साजरा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधिन होता.

**शासन निर्णय :-**

याप्रकरणी शासनाने साकल्याने विचार करुन राज्यामध्ये संविधानाबाबत जनजागृती व्हावी यादृष्टिने **दरवर्षी दिनांक २६ नोव्हेंबर हा दिवस "संविधान दिवस"** म्हणून राज्यात सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये, जिल्हापरिषदा, पंचायतसमित्या, महानगरपालिका, नगरपालिका ग्रामपंचायती, महाराष्ट्रातील सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व महाविद्यालयांमध्ये, पुढीलप्रमाणे साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे.

१) राज्यात सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये, जिल्हापरिषदा, पंचायतसमित्या, महानगरपालिका, नगरपालिका ग्रामपंचायती, महाराष्ट्रातील सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व महाविद्यालयांमध्ये संविधानाच्या प्रास्ताविकेचे (Preamble) (परिशिष्ट-१ पहावे) सामुहिक वाचन करण्यात यावे.

२) संविधानाबाबत जनजागृती व्हावी म्हणून सर्व शाळा, महाविद्यालयामार्फत त्या दिवशी "संविधान यात्रा" काढण्यात यावी व त्यामध्ये संविधानाची प्रास्ताविका, मूलभूत हक्क, कर्तव्ये व जबाबदाऱ्या इत्यादी संविधानातील महत्वाची कलमे ठळकरित्या दिसतील असे बॅनर्स, पोस्टर्स वापरावेत.

३) याबाबत शाळा, महाविद्यालयांमध्ये निबंध/भित्तीपत्रके/सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

४) शासकिय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत संविधानाबाबत जनजागृती करणारी व्याख्याने, कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत इत्यादी.

शासन पुढे असेही आदेश देत आहे की, उपरोक्त कार्यक्रम साजरा करण्याकरीता येणारा खर्च संबंधीत प्रशासकिय विभागाने/कार्यालयाने हा त्यांच्या कार्यालयीन खर्चातून किंवा अशाच तऱ्हेच्या उद्दिष्टांसाठी असलेल्या तरतूदीतून भागवावा.

शासन पुढे असेही आदेश देत आहे की, प्रत्येक कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयात वरील प्रमाणे **"संविधान दिवस"** साजरा करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य शासनास दिनांक ५ डिसेंबर पर्यंत जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

टी. एफ. थेल्केकर

**(टी.एफ.थेल्केकरा)**
**शासनाच्या प्रधान सचिव.**

**प्रति,**

मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/खाजगी सचिव,
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव/खाजगी सचिव,
मा. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्विय सहाय्यक
मा. मुख्य सचिव सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय, मुंबई,
मा.प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई/नागपूर व औरंगाबाद खंडपिठ.
सर्व मा. अपर मुख्य सचिव, /प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय मुंबई,
मा. कुलपती, राज्यातील सर्व विद्यापिठे.
प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई.
सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सचिव, राज्य माहिती आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सचिव, राज्य मानवाधिकार आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महालेखापाल-१, महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-२ महाराष्ट्र, नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग **(सदर शासन निर्णयाच्या प्रती आवश्यक कार्यवाहीस्तव आजच त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुखांना फॅक्सद्वारे पाठवीण्याच्या विनंतीसह).**
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
महासंचालक माहिती वं जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.(आवश्यक ती प्रसिध्दी देण्यासाठी)
सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी **(सदर शासन निर्णयाच्या प्रती आवश्यक कार्यवाहीस्तव आजच त्यांच्या विभागातील/जिल्ह्यातील सर्व कार्यालय प्रमुखांना फॅक्सद्वारे पाठवीण्याच्या विनंतीसह).**
सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व आयुक्त महानगर पालिका
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली.
सार्वजनिक बांधकाम विभाग, (प्रशा- ४ ) मंत्रालय मुंबई
निवड नस्ती.

परिशिष्ट-१

# भारताचे संविधान

## उद्देशिका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा
व उपासना यांचे स्वातंत्र्य;
दर्जाची व संधीची समानता;
निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन;
आमच्या संविधानसभेत
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करुन स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.

------

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

मासं/रवका/न.क्र.३४८/०३०९७
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. : ०२२ - ६९४२५१४१
दिनांक: ३०.०१.२०२५

# परिपत्रक

**विषय: सन २०२५ पासून राष्ट्रपुरूष / थोर व्यक्ती यांची जयंती व राष्ट्रीय दिन साजरे करताना संबंधित राष्ट्रपुरूष / थोर व्यक्ती यांचा माहिती फ़लक (अल्प परिचय) प्रदर्शित करण्याबाबत.**

**संदर्भ:** १) प्रशासकीय परिपत्रक क्र. ६८६ दि. ०१.०१.२०२५.
२) सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन परिपत्रक क्र.GAD-49022/50/2024-GAD (DESK-29) दि.१०.०१.२०२५.

*****

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन परिपत्रक क्र.GAD-49022/65/2024-GAD (DESK-29) दि.२७.१२.२०२४ अन्वये सन २०२५ मध्ये राष्ट्र पुरूष/ थोर व्यक्ती यांची जयंती व राष्ट्रीय दिनांचे कार्यक्रम मंत्रालयात व सर्व शासकीय/ निमशासकीय कार्यालयात साजरे करण्याबाबतच्या सूचना पारित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार प्रशासकीय परिपत्रक क्र. ६८६ दि. ०१.०१.२०२५ अन्वये कंपनीतील सांघिक व क्षेत्रिय कार्यालयांमध्ये याबाबतची अंमलबजावणी करण्याकरिता सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

२. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन परिपत्रक क्र.GAD-४९०२२/५०/२०२४-GAD (DESK-२९) दि.१०.०१.२०२५ अन्वये राष्ट्रपुरूष / थोर व्यक्ती यांची जयंती साजरी करताना संबंधित राष्ट्रपुरूष / थोर व्यक्ती यांचा माहिती फ़लक (अल्प परिचय) प्रदर्शित करण्याबाबतच्या सूचना पारित करण्यात आलेल्या आहेत. सोबत दि.१०.०१.२०२५ चे संदर्भीय शासन परिपत्रकाची प्रत माहितीस्तव जोडण्यात येत आहे.

३. या अनुषंगाने सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, राष्ट्रपुरूष / थोर व्यक्ती यांची जयंती साजरी करतांना शासन परिपत्रक दि.१०.०१.२०२५ अन्वये दिलेल्या सूचनांनुसार त्यांचा अल्पपरिचय देण्यासाठी सनबोर्डवर माहिती फलक छापून कंपनीच्या सांघिक व क्षेत्रिय कार्यालयांमध्ये प्रदर्शित करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**सोबत:** शासन परिपत्रक दि.१०.०१.२०२५.

**( भूषण कुलकर्णी )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (वित्त)/(संचलन)/(प्रकल्प)/(वाणिज्य)/(मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (सुवअं)/(मासं)/(पायाभूत आराखडा/विशेष प्रकल्प)/(देयके व वसूली)/(वितरण)/(वित्त व लेखा) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी सल्लागार/मुख्य तपास अधिकारी/ कंपनी सचिव म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.

३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.

४) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई. (सांघिक कार्यालय/क्षेत्रीय कार्यालय)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**सन २०२५ पासून राष्ट्रपुरुष / थोर व्यक्ती यांची जयंती व राष्ट्रीय दिन साजरे करताना संबंधित राष्ट्र पुरुष थोर व्यक्ती / यांचा माहिती फलक (अल्प परिचय) प्रदर्शित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक : GAD-४९०२२/५०/२०२४-GAD (DESK-२९)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : १० जानेवारी, २०२५.

**संदर्भ**:- GAD-49022/65 /2024-GAD (DESK-29), दिनांक २७.१२.२०२४.

**प रि प त्र क -:**

सन २०२५ मध्ये राष्ट्र पुरुष / थोर व्यक्ती यांची जयंती व राष्ट्रीय दिनांचे कार्यक्रम मंत्रालयात व सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालयात साजरे करण्याबाबत संदर्भाधीन परिपत्रकान्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

२. संदर्भाधीन शासन परिपत्रक सर्व शासकीय /निमशासकीय कार्यालयाबरोबरच राज्यातील सर्व महाविद्यालये व सर्व शाळा यांनाही लागू करण्यात येत आहे.

३. राष्ट्र पुरुष / थोर व्यक्ती यांची जयंती साजरी करताना त्यांचे जीवनचरित्र (अल्प परिचय) दर्शविणारा फलक लावण्यात यावा.

४. राष्ट्र पुरुष /थोर व्यक्ती यांच्या जीवनचरित्राची (अल्प परिचय) माहिती शासनाच्या https://gad.maharashtra.gov.in या वेबसाईटवरील **"जयंती फलक"** या शिर्षाखाली (Category) वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल.

५. राष्ट्र पुरुष/ थोर व्यक्ती यांचे जीवनचरित्राबाबतची (अल्प परिचय) माहिती २३ इंच x २५ इंच आकाराच्या सनबोर्डवर छापून सनबोर्ड तयार करण्यात यावेत.

६. याबाबत होणारा खर्च संबंधित कार्यालयाच्या कार्यालयीन खर्चातून भागविण्यात यावा.

७. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२५०११०११३४०४९००७ असा आहे. सदरचे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

DILIP N DESHPANDE

Digitally signed by DILIP N DESHPANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=04b1da429ec9f808e2f142fb8df848a9c440a68828f957571e8bbc53318e3a6f, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9A444B962C8442B754FC8343183DBEA1519A71F4D0CD0A5CCA8BF9534EF3A0A8, cn=DILIP N DESHPANDE
Date: 2025.01.10 11:39:48 +05'30'

**( दिलीप देशपांडे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय,मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री ( नगरविकास व गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

५. सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
६. मा.मुख्य सचिव (प्र.ना.उ.सु.) (अति.कार्य.), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व अपर मुख्य सचिव सचिव / प्रधान सचिव / मंत्रालय, मुंबई.
८. सर्व मंत्रालयीन विभाग.

यांना विनंती करण्यात येते की, आपल्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व शासकीय / निमशासकीय तसेच महाविद्यालये व शाळा यांना सदर परिपत्रकाची प्रभावी तात्काळ अंमलबजावणी करण्याबाबत आपल्या स्तरावरुन देखील सूचना देण्यात याव्यात.

९. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने
१०. सह सचिव ,सार्वजनिक बांधकाम विभाग (प्रशा-४) यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरीता.
११. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई ( प्रसिध्दी देण्यासाठी )
१२. सर्व विभागीय आयुक्त.
१३. सर्व जिल्हाधिकारी.
१४. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१५. आयुक्त, सर्व महानगरपालिका
१६. निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली
१७. निवड नस्ती (कार्या-जपुक)